(10)


# नवी मुंबई महानगरपालिका

# Navi Mumbai Municipal Corporation

**कार्यालय :** न.मुं.म.पा. मुख्यालय, भूखंड क्र.१, किल्ले गांवठाण जवळ, पामबीच जंक्शन, से -१५ए, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४.
**दूरध्वनी :** ०२२-२७५६ ७०७०/१/२/३/४/५
**फॅक्स :** ०२२-२७५७३७८५ / २७५७७०७०

**Office :** N.M.M.C. Head Quarter, Plot No.1, Near Kille Gaonthan, Palmbeach Junction, Sec-15A, C.B.D. Belapur, Navi Mumbai - 400 614.
**Tel. :** 022 - 2756 7070 /1/2/3/4/5
**Fax. :** 022 - 27573785 / 27577070


जा. क्र. नमुंमपा./नरवि./बां.प./प्र.क्र. 20171CNMMC12246/8309/२०१७
दिनांक 95/10/२०१७

प्रति,
**मे. चामुंडा इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.,**
भुखंड क्र.१५, सेक्टर क्र. ३८,
नेरुळ, नवी मुंबई.

<u>नस्ती क्र. नमुंमपा/वि.प्र.क्र.--</u> **<u>प्रकरण क्र. 20171CNMMC12246</u>**

विषय — **भुखंड क्र. १५, सेक्टर क्र. ३८, नेरुळ,** नवी मुंबई या जागेत <u>निवासी व वाणिज्य</u> कारणासाठी बांधकाम परवानगी देणेबाबत.

संदर्भ - आपला वास्तुविशारद यांचा दि.१२/०७/२०१७ व ०७/०९/२०१७ रोजीचा प्राप्त अर्ज.

महोदय,

**भुखंड क्र. १५, सेक्टर क्र. ३८, नेरुळ,** नवी मुंबई या जागेत <u>निवासी व वाणिज्य</u> कारणासाठी बांधकाम परवानगी देणेबाबतचा प्रस्ताव महानगरपालिकेस वरील संदर्भाधिन पत्रान्वये प्राप्त झालेला आहे. संदर्भाधिन जागेत निवासी व वाणिज्य उपयोगासाठी बांधकाम परवानगी मुंबई प्रांतिक अधिनियम, १९४९ च्या कलम २५३ व २५४ तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ४५(१) (३) मधील तरतुदीनुसार सदर पत्रातील १ ते ६ अटी व बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्रातील पुर्तता/पालन करणेचे अटीसापेक्ष प्रकरणी बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र मंजुर करण्यात येत आहे.

पाणी पुरवठा व मलनिःस्सारण सुविधा आवश्यक शुल्क भरणा केल्यानंतर उपलब्ध करुन देण्यात येतील.

सार्वजनिक स्वरुपाच्या रस्त्यावर व गटारीत बांधकाम साहित्य पडणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. अशाप्रकारे बांधकाम साहित्य रस्त्यावर अथवा इतर सार्वजनिक जागेवर आढळुन आल्यास आपणावर कार्यवाही करणेबाबत संबंधित विभागास कळविण्यात येईल किंवा बांधकाम परवानगी रद्द करण्याबाबतची कार्यवाही सुध्दा करण्यात येईल याबाबतची नोंद घ्यावी.

बांधकाम सुरु असताना जागेवरील रिकामे गाळे / सदनिका यांची संरक्षणाची जबाबदारी संबंधित जमिनमालक / भुखंडधारक / गाळेधारक यांची राहिल. तसेच अर्धवट बांधलेल्या जागेचा गैरवापर होऊ नये म्हणुन संबंधित भुखंड धारकाने कुंपण भिंत बांधुन त्या ठिकाणी अनुचित प्रकार होणार नाही याची दक्षता घ्यावी. गैरकृत्य करताना आढळल्यास संबंधितांस कायदेशिर कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

भूखंड सखल भागामध्ये असल्यास जमीनीची पातळी (Ground Level) भरणी करुन उंच करावी. जमीनीची पातळी ही रस्ता आणि Sewer Line यांच्या पेक्षा उंचावर असली पाहिजे. सांडपाणी, पावसाळयाचे पाणी आणि मल यांचा निचरा योग्यपणे होऊन भुखंडामध्ये पाणी साचणार नाही अशी भूखंडाची पातळी तयार करावी.

इमारतीचे बांधकाम मंजूर नकाशाप्रमाणे करण्यात यावे. बांधकामामध्ये फेरफार अथवा वाढीव बांधकाम करावयाचे असल्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमातील तरतुदीनुसार सुधारीत बांधकाम नकाशे मंजुर करुन घेणे आवश्यक आहे. मंजुर नकाशा व्यतिरिक्त बांधकाम केल्यास ते कायद्यातील तरतुदीनुसार कारवाईस पात्र राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

इमारतीचे बांधकाम करणारे मजुरांचे निवासीकरीता (Labour Shed) भूखंडाचे हद्दीत आरोग्याच्या दृष्टीकोनातुन त्यांचे तात्पुरते टॉयलेटसह सोय करणे आवश्यक आहे. त्यासाठी भूखंडाचे एका बाजुचे सामासिक अंतरात ३.०० मी. रुंदीचे तात्पुरती शेडस् टॉयलेट करण्यास परवानगी देणेत येत आहे. याबाबत पुरेशी व्यवस्था न केल्यास जोता लेव्हलचे पुढील काम करणेस परवानगी देता येणार नाही. तसेच भोगवटा प्रमाणपत्रासाठी अर्ज करणेपूर्वी सदर शेड स्वखर्चाने काढुन टाकणेत यावी.

कृ.मा.प.

बांधकाम सुरु करताना कामाचे नाव, बांधकाम परवानगीची तारीख, वास्तुविशारदाचे नांव, जमिन मालकाचे नांव, ठेकेदाराचे नांव, बांधकाम क्षेत्र इ. बाबी दर्शविणारा फलक लावण्यात यावा. महानगरपालिकेस माहीतीसाठी ठेकेदाराचे नाव व दुरध्वनी क्रमांक इ. बाबतचा तपशिल काम सुरु केल्यानंतर या कार्यालयास पाठविण्यात यावा ही विनंती.

अट :-

१) प्रस्तुत भूखंडावरील इमारतीचे बांधकाम करीत असतांना बांधकामामुळे आजुबाजुच्या नागरीकांना प्रदुषणाचा त्रास होणार नाही तसेच बांधकाम प्रगतीपथावर असताना बांधकामावरील मजूर अथवा सभोवतालच्या परिसरामधील नागरीकांच्या सुरक्षिततेसाठी National Building Code मधील तरतुदींचे तसेच अनुषंगीक कायद्यातील तरतुदींचे काटेकोरपणे पालन / अंमलबजावणी करणे संबंधीत भूखंडधारक / विकासकांवर बंधनकारक राहिल. जर भविष्यात आपले मालकीच्या भूखंडावर चालु असलेल्या बांधकामामुळे जिवीत अथवा सार्वजनिक / खाजगी मालमत्तेस कुठल्याही प्रकारची हानी झाल्यास त्यास संबंधीत भूखंडधारक /विकासक हे सर्वस्वी जबाबदार राहतील.

२) प्रस्तुत भूखंडावर भोगवटा प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर करणेपूर्वी आपले भूखंडाचे आजुबाजुस असणा-या सार्वजनिक स्वरुपाचे पदपथ, रस्ते, गटारे, जलवाहिन्या, मलनिःस्सारण वाहिन्या इत्यादी बाबीस काही हाती पोहोचले असल्यास सदर बाबी पुर्ववत करण्याची सर्वस्वी जबाबदारी भूखंडधारकाची /विकासकाची राहील अन्यथा भोगवटा प्रमाणपत्रासाठी अर्ज विचारात घेतला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

३) प्रस्तुत भूखंडावर बांधकाम परवानगी दिल्यानंतर संबंधित भूखंडाच्या वास्तुविशारदाने कामाच्या प्रगतीबाबतचा अहवाल दर दोन महिन्यांनी या कार्यालयास विना विलंब सादर करणे बंधनकारक राहील अन्यथा भोगवटा प्रमाणपत्रासाठी आपला अर्ज विचारात घेतला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

४) आपण आपले नियोजित इमारतीचे बांधकाम प्रत्यक्ष सुरु करण्यापुर्वी आपण सादर केलेलया हमीपत्रानुसार बांधकाम करतांना आवश्यक असणाऱ्या कामगारांच्या कुटुंबामधील ६ ते १४ वर्ष वयोगटातील मुले प्राथमिक शिक्षणापासुन वंचित राहु नये या दृष्टीने त्यांच्या प्राथमिक शिक्षणाची सोय उपलब्ध होत असल्याची खातरजमा करणे अनिवार्य आहे. तशाप्रकारे कामगारांच्या कुटुंबाची व्यवस्था करण्याची आपली अथवा आपले द्वारा नियुक्त केलेल्या कंत्राटदाराची सर्वस्वी जबाबदारी आहे, याची कृपया नोंद घ्यावी.

५) दिनांक : १३/०४/२०१७ रोजीचे शासन नगर विकास विभागाने अधिनियमातील कलम १५४ (१) अन्वये वन व पर्यावरण मान्यता (Environment Clearance) बाबत दिलेलया निर्देशातील Appendix-A, Category-१ (५००० to less than २०,००० Sq.mt.) पर्यंतच्या प्रस्तावासाठी नमुद केलेल्या अटीनुसार व विकासकाने सादर केलेला पर्यावरण तज्ञांचा लेखा परिक्षण अहवालाप्रमाणे जागेवर सर्व बाबींची पुर्तता करणे विकासक यांच्यावर बंधनकारक राहील. सदरचे Category-१ बाबतचे पर्यावरणाबाबतच्या अटीची छायाप्रत (Appendix-A) सोबत संलग्न करण्यात येत आहे.

६) प्रस्तुत प्रकरणात सादर करण्यात आलेली कुठलीही माहिती / कागदपत्रे चुकीची अथवा दिशाभूल करणारी असल्याचे निदर्शनास आल्यास सदरची परवानगी आपोआप रद्द होईल.

आपला,

(ओवैस ए. मोमीन)
सहाय्यक संचालक, नगररचना,
नवी मुंबई महानगरपालिका

<u>प्रत माहितीसाठी :-</u>

१. मे. पीसीएस, वास्तुविशारद,
१०५, विंदया कॉम्प्लेक्स, सेक्टर ११, सिबीडी बेलापुर,
नवी मुंबई-४००६१४.
२. व्यवस्थापक शहर सेवा, सिडको लि.
३. उपआयुक्त (उपकर), नमुंमपा.
४. विभाग अधिकारी, नेरुळ, नमुंमपा.